## निवडक

### वैद्यकीय शिबिराला मच्छीमारांचा प्रतिसाद

**वसई :** कोळी युवाशक्ती संघटनेतर्फे शनिवारी पाचूबंदर येथे आयोजित केलेल्या विनामूल्य वैद्यकीय तपासणी आणि औषध वितरण शिबिराचा दीडशेहून अधिक मच्छीमार महिला आणि पुरुषांनी लाभ घेतला. या शिबिरादरम्यान मुंबईतील प्रख्यात अस्थिशल्यविशारद डॉ. आशित बावडेकर यांनी तपासणी करून संबंधितांना आवश्यक औषधे दिली. काही रुग्णांना प्लास्टरही करण्यात आले. काही रुग्णांना आवश्यक चाचण्यांचा सल्ला देऊन त्याचे रिपोर्ट्स मुंबईतील क्लीनिकमध्ये आणून दाखवल्यास त्यानुसार पुढील उपचार करण्याचे आश्वासन दिले. ईस्टरनंतर दरवर्षी कोळी युवाशक्ती संघटनेतर्फे मुंबईतील सुप्रसिद्ध अस्थिशल्यतज्ज्ञ डॉ. आशित बावडेकर यांच्या मार्गदर्शनाखाली मच्छीमार समाजातील गरजूंसाठी विनामूल्य आरोग्य तपासणी आणि औषध वितरण शिबीर आयोजित केले जाते.

### युवासेना अध्यक्षपदी नितीन लांडगे

**ठाणे :** शिवसेनेचे नेते एकनाथ शिंदे यांच्या आदेशानुसार खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली पूर्वेश सरनाईक यांच्या विनंतीनुसार युवासेना पदाधिकारी जाहीर करण्यात आले. युवा सेना ठाणे व धाराशिव लोकसभा अध्यक्षपदी ठाण्यातील नितीन सुबराव लांडगे यांची करण्यात आली. लांडगे यांच्या नियुक्तीमुळे ठाणे आणि धाराशिवमधील तरुण युवा कार्यकर्त्यांनी जल्लोषात त्यांचे अभिनंदन केले. नितीन लांडगे हे अनेक वर्षे ठाणे आणि धाराशिव विभागासाठी युवा सेनेत कार्यरत आहेत. धाराशिव युवा सेना संपर्क प्रमुखपदी काम करताना धाराशिवमधील शाळा, महाविद्यालय, शैक्षणिक संस्था, प्रशासकीय कामकाजासाठी लांडगे यांचा दांडगा जनसंपर्क आहे.

### स्थलांतरित कुटुंबांना वसईत धान्य वाटप

**वसई :** डहाणू-वाडा तालुक्यातील रोजी-रोटीसाठी स्थलांतरित झालेल्या व नागले, कामण परिसरात वीटभट्टीवर काबाडकष्ट करणाऱ्या १५० आदिवासी कुटुंबांना स्व. साकार गुप्ता यांच्या १९ व्या पुण्यतिथीनिमित्त मुंबई येथील मामन सन्सचे उद्योजक सुभाषजी गुप्ता परिवारातर्फे धान्य वाटपाचा कार्यक्रम जूचंद्र येथील शिव छत्रपती समाज सेवा मंडळाच्या सहकार्याने आयोजित केला होता. त्यावेळी प्रत्येक कुटुंबाला तांदूळ, डाळ, साखर, चहा, कडधान्य, तेल, हळद, मसाला, पीठ, साबण, बिस्कीट व गोड शिऱ्याचे वाटप करण्यात आले. कार्यक्रमास उद्योजक सुबोधची गुप्ता, रामस्वरूपजी अग्रवाल, सिंघानिया, रामचंद्रजी रामूका व गुप्ता परिवार व वीटभट्टी मालक उपस्थित होते. उपस्थित आदिवासी बांधवांना मंडळाचे संस्थापक पुरुषोत्तम पाटील यांनी बहुमोल मार्गदर्शन केले.

# अनधिकृत घरे खाली करण्याचे अप्पर तहसीलदारांचे आदेश

## डोंगरी, चौक व धावगी डोंगर येथील रहिवाशांना नोटिसा

**भाईंदर :** मीरा-भाईंदर शहरातील सरकारी गुरुचरण जागा बळकावून त्याठिकाणी झोपड्या व बंगले, हॉटेल्स, रिसॉर्ट व लॉजिंग आदी बेकायदा बांधकामे संरक्षित होत नसतील, तर ती तोडून जागा सरकारच्या ताब्यात देण्याच्या नोटिसा अप्पर तहसीलदार यांनी पाठवल्या आहेत.

भाईंदर पश्चिमेच्या उत्तन येथे मोठ्या प्रमाणात महसूल विभागाची म्हणजेच सरकारी जागा आहे. या जागेवर गेल्या अनेक वर्षांपासून तेथील आजूबाजूच्या गावातील रहिवाशांनी घरे बांधली आहेत. उत्तन येथील चौक, डोंगरी, भाटे बंदर, तसेच धावगी येथे असलेल्या सरकारी, तसेच गायरानाच्या जमिनींवर बांधण्यात आलेल्या शेकडो घरांना भाईंदरच्या अप्पर तहसीलदार कार्यालयाकडून नोटिसा बजावण्यात आल्या आहेत. करण्यात आलेले अतिक्रमण शासनाच्या कोणत्याही धोरणानुसार संरक्षित होत असेल तर त्यासंबंधीचे तीस दिवसांत कागदपत्र सादर करा, नाहीतर करण्यात आलेली अतिक्रमणे हटवण्यात येतील, असे नोटिसांमध्ये नमूद करण्यात आले आहे.

भाईंदर पश्चिमेला असलेल्या उत्तन या भागात मोठ्या प्रमाणात रहिवासी वस्ती आहे. तेथे असलेल्या सरकारी तसेच गायरानाच्या जागेत रहिवाशांनी घरे बनवली आहे. परंतु तहसीलदार यांच्याकडून येथील रहिवाशांना घराची कागदपत्रे सादर करण्यासाठी नोटिसा बजावण्यात आल्या आहेत. २०१० मध्ये देखील अशाच प्रकारच्या नोटिसा गावकऱ्यांना देण्यात आल्या होत्या. मात्र त्यानंतर गायरानच्या जमिनींवरील अतिक्रमणे नियमित करण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे.



### नागरिकांमध्ये संभ्रम

शासनाने सरकारी जागेवरील २००० पर्यंतची अतिक्रमणे नियमित करण्याचा निर्णयही घेतला आहे. तरीही उत्तनमधील रहिवाशांना या नोटिसा दिल्यामुळे अतिक्रमण केल्याचा विषय उभा राहिला आहे. शासनाने निर्णय घेतलेला असताना उत्तन परिसरात पिढ्यान्‌पिढ्या राहत असलेल्या रहिवाशांना नोटिसा बजावण्यात आल्याने नागरिकांमध्ये संभ्रम निर्माण झाला आहे. या नोटिसा कशासाठी बजावण्यात आल्या आहेत, असा प्रश्न मच्छीमारांचे नेते बर्नड डिमेलो यांनी उपस्थित केला आहे.

१६ फेब्रुवारी २०१८ अन्वये प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत लाभ मिळण्यास पात्र ठरत असलेल्या लाभार्थींची शासकीय जमिनीवरील अतिक्रमण नियमानुकूल करण्याचा निर्णय घेतला आहे. तसेच २२ ऑगस्ट २०२२ अन्वये सर्वांसाठी घरे या योजनेंतर्गत बेघर व्यक्तींनी निवासी प्रयोजनासाठी शासकीय जमीन तसेच गायरान जमिनीवरील केलेली अतिक्रमणे नियमानुकूल करण्याचा व बेघर भूमिहीन लाभार्थ्यांना जमीन उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेतला आहे. परंतु मुंबई उच्च न्यायालयात दाखल झालेल्या सुमोटो जनहित याचिकेत न्यायालयाने सहा सप्टेंबर २०२२ रोजीच्या आदेशान्वये महाराष्ट्र राज्यामधील गायरान जमिनीवरील केलली अतिक्रमणे ही कोणत्याही परिस्थितीत या वर्षाअखेर निष्कासित करण्याचे निर्देश दिलेले आहे.

शासकीय जमिनींवरील अतिक्रमणे हटवण्याचे अधिकार तहसीलदारांना देण्यात आले आहेत. त्यानुसार उत्तनमधील चौक, डोंगरी, भाटे बंदर, तसेच धावगी येथे असलेल्या शासकीय जमिनी, तसेच गायरानाच्या जमिनींवर बांधण्यात आलेल्या शेकडो घरांना अप्पर तहसीलदारांनी नोटिसा बजावल्या आहेत.

# रखडलेल्या रुग्णालयाच्या कामाला गती देण्याची शिवसेनेची मागणी

## ...अन्यथा आंदोलनाचा इशारा

**वसई :** वसई-विरार महानगरपालिका हद्दीत नवघर, वसई पश्चिम येथे जिल्हा परिषदेचे आरोग्य केंद्र असून त्या ठिकाणी १०० खाटांच्या उपजिल्हा रुग्णालयाला मंजुरी देण्यात आली आहे. त्यासाठी जागेची पाहणी करून प्लानही तयार करण्यात आला आहे. मात्र हा प्रश्न २०१४ पासून प्रलंबित आहे. सदर रुग्णालय बांधकाम व निधी मंजुरीसाठी २०१९ ला मान्यता देण्यात आली आहे. असे असतानाही अजूनही या ठिकाणी रुग्णालयाचे काम सुरू न झाल्याने उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेनेचे वसई तालुका प्रमुख राजाराम बाबर यांनी राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना निवेदन दिले आहे. या निवेदनात हे काम तातडीने सुरू न झाल्यास आंदोलनाचा इशाराही त्यांनी दिला आहे.

वसई तालुका हा मुंबईला लागून असला तरी याठिकाणी एकही मोठे सरकारी रुग्णालय नाही. त्यामुळे रुग्णांना उपचारासाठी खासगी रुग्णालयावर अवलंबून राहावे लागते किंवा मुंबईला जाण्याची वेळ रुग्णावर येत असते. वेगवान प्रगतीचा महाराष्ट्र म्हणून जाहिरात करणाऱ्या या राज्य सरकारला नागरिकांशी निगडित असलेल्या या प्रश्नाकडे पाहण्यास मात्र वेळ नसल्याची टीका राजाराम बाबर यांनी केली आहे. रुग्णालय बांधकामासाठी मोकळी जागा मोठ्या प्रमाणात उपलब्ध आहे. निधीही मंजूर झाला असतानाही अजूनपर्यंत बांधकाम सुरू न झाल्याने, तसेच इमारतीच्या बांधकामाबाबत उशीर होत असल्यामुळे स्थानिकांनी नाराजी व्यक्त केली आहे. या मागणी संदर्भात विरोधी पक्षनेते अजित पवार, अंबादास दानवे, स्थानिक आमदार हितेंद्र ठाकूर यांनाही निवेदनाची प्रत पाठविण्यात आली आहे. पावसाळी अधिवेशनअगोदर याबाबत निर्णय न झाल्यास शिवसेना आंदोलन करेल असा इशारा ही त्यांनी या निवेदनात दिला आहे.

### तीन वर्षांत एकही वीट रचली नाही

स्थानिकांच्या आरोग्याशी निगडीत असलेल्या रुग्णालयाचे बांधकाम लवकरात लवकर सुरू करावे, असे आदेश आरोग्य सेवेचे उपसंचालक हेमंतकुमार बोरसे यांनी जिल्हा शल्यचिकित्सक पालघर यांना २०१९ मध्ये दिले होते. गेल्या तीन वर्षांत या रुग्णालयासाठी एकही वीट रचण्यात आली नसून, या प्रकरणात झारीतील शुक्राचार्य कोण याचा शोध घेण्याचे आवाहन बाबर यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, आरोग्य मंत्री तानाजी सावंत, यांना केले आहे.

# राष्ट्रवादीचे चार कार्यकर्ते तडीपार

**ठाणे :** राष्ट्रवादीचे माजी मंत्री आणि कळवा-मुंब्रा विधानसभा आमदार डॉ. जितेंद्र आव्हाड यांच्या वादग्रस्त कौटुंबिक ऑडिओ क्लिप व्हायरल झाली. संतप्त राष्ट्रवादीच्या चार कार्यकर्त्यांनी सहाय्यक आयुक्त महेश आहेर यांचा निषेध नोंदवून ठाणे पालिकेच्या मुख्यालयाच्या प्रवेशद्वारावरच मारहाण केली होती. सदर राष्ट्रवादीचे चार कार्यकर्ते अभिजीत पवार, हेमंत वाणी, विक्रम खामकर, विशांत गायकवाड यांच्यावर नौपाडा पोलिसांनी तडीपारीची कारवाई केल्याची माहिती सूत्रांनी दिली.

राष्ट्रवादीचे कार्यकर्ते अभिजित पवार, हेमंत वाणी, विक्रम खामकर, विशांत गायकवाड यांनी १५ फेब्रुवारी रोजी ठाणे पालिकेचे सहाय्यक आयुक्त महेश आहेर यांच्यावर जीवघेणा हल्ला करण्यात आला होता. हल्ल्याप्रकरणी नौपाडा पोलीस ठाण्यात जीवेठार मारण्याचा प्रयत्न केल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला होता.

### सहाय्यक आयुक्त आहेर मारहाण प्रकरण

याप्रकरणी मारहाण करणारे अभिजीत पवार, हेमंत वाणी, विक्रम खामकर, विशांत गायकवाड यांना ठाणे न्यायालयात हजर केले असता त्यांना पोलीस कोठडी आणि नंतर न्यायालयीन कोठडी सुनावली. सदरप्रकरणी कायदा आणि सुव्यवस्थेचा विचार करून नौपाडा पोलिसांनी चारही आरोपींना ठाणे जिल्ह्यासह मुंबई, नवी मुंबई, रायगड जिल्ह्यातून दोन वर्षे हद्दपार करण्याची कारवाई केली आहे.

# मुरबाड शहर पाणी टंचाईग्रस्त; गावांना टँकरने पाणीपुरवठा

**मुरबाड :** महाराष्ट्रात सर्वात जास्त उष्णतेचा फटका मुरबाड तालुक्याला बसत असून यावेळी माणसं पाण्यासाठी वणवण करतानाचे चित्र पहावयास मिळत आहे.

मुरबाड तालुक्यात स्वातंत्र्यापूर्वीपासून पाणी टंचाई असलेली २२ गावे अन्य पाडे आजही भीषण पाणी टंचाईने त्रस्त झाली आहे. मुरबाडपासून ४० ते ५० किलो मीटर असलेल्या गावांना मुरबाड शहरातील एमआयडीसीमधील पाइपलाईनमधून टँकरने पाणीपुरवठा केला जात आहे. पाणीपुरवठा करण्यासाठी पाच ते सहा टँकर मुरबाड एमआयडीसीमध्ये लाईनमध्ये उभे असतात, याबाबत टँकरवाल्यांना विचारणा केली असता, या टँकरच्या माध्यमातून दरीखोऱ्यातील झाडघर, झापवाडी गांवाना पाणीपुरवठा केला जात असल्याचे सांगितले. मुरबाड तालुक्याचे तापमान ४३ टक्के असून मुरबाडमधील सर्व पाण्याचे स्त्रोत आटले आहेत. त्यामुळे पाण्यासाठी नागरिकांची वणवण सुरू असल्याचे चित्र पहावयास मिळत आहे.

मुरबाड तालुक्यात काळू, भातसा, बारवी, मुरबाडी नद्यांचा उगम असून लघु पाटबंधारे विकास महामंडळाची १७ ते २ छोटी बंधारे आहेत. मुंबईसह परिसरातील शहरांना पाणीपुरवठा करणारे बारवी धरण मुरबाड तालुक्यात असताना मात्र मुरबाडवासी स्वातंत्र्याच्या ७५ रीनंतरही पाण्यासाठी वणवण फिरत असल्याची खंत स्थानिकांकडून व्यक्त केली जात आहे.




## विकासकामांच्या प्रतीक्षेत स्थानिक

**माथेरान :** आलेल्या संधीचे सोने करण्याची भावना माथेरानमधील काही अल्पसंतुष्ट तसेच संकुचित वृत्तीच्या मंडळींमुळे विकोपाला गेली आहे. माथेरानच्या विकास कामांसाठी कधी नव्हे, एवढा भरघोस निधी मागील काळात उपलब्ध झालेला आहे. याच निधीतून घाटरस्ता, ठरावीक पॉइंट्सचे सुशोभीकरण आणि दस्तुरी ते पांडे रोडपर्यंतचा रस्ता क्ले पेव्हर ब्लॉकच्या माध्यमातून बनविण्यासाठी या निधीचा वापर करण्यात येत होता. सर्व कामे जवळपास मार्गी लागलेली असून केवळ लायब्ररीपासून ते पांडे रोडपर्यंतच्या रस्त्याच्या कामात अडथळा आणण्यात आला.

माथेरानमध्ये कोणत्याही प्रकारचा विकासात्मक बदल घडू नये, तसेच आमचा पूर्वापार जो काही व्यवसाय सुरू आहे, तोच भावी पिढीच्या प्रगतीसाठी सुद्धा लाभदायक राहील, अशी भावना असलेल्या लोकांमुळेच रस्त्याचे काम अर्धवट स्थितीत आहे. क्ले पेव्हर रस्त्यांमुळे हातगाडी ओढणाऱ्या श्रमिकांची त्रासातून सुटका होणार आहे तसेच यामुळे पर्यटकांचा प्रवास देखील सुखकारक होणार आहे. क्ले पेव्हरमुळे धुळीचे प्रमाण कमी होत असल्यामुळे लोकांचे आरोग्य सुद्धा चांगले राहत असल्याचे वैद्यकीय अधिकाऱ्यांकडून बोलले जात आहे. शालेय विद्यार्थ्यांची मोठ्या प्रमाणात दमछाक होते. संबंधित ठेकेदाराने रस्त्यावर काळी खडी अंथरून ठेवल्याने काही दिवसांपूर्वी माजी नगरसेवक प्रकाश सुतार यांचा तोल गेल्याने जखमी झाले होते. त्यामुळेच हे गाव अद्यापही विकसनशील होऊ शकले नसल्याची भावना ज्येष्ठ नागरिकांनी व्यक्त केली आहे.

## रिफायनरीविरोधात डोंबिवलीत आंदोलन

**डोंबिवली :** कोकणात रिफायनरी प्रकल्प सुरू करण्याच्या सरकारच्या निर्णयाला कोकणवासीयांनी कडाडून विरोध केला आहे. पोटापाण्यासाठी चाकरमानी शहरात नोकरी- व्यवसाय करत असली तरी हा प्रकल्प कोकणात नको असे चाकरमान्यांनी शहरातही आंदोलन करण्यास सुरुवात केली. रविवारी डोंबिवलीत चाकरमान्यांनी आंदोलन केले.

डोंबिवलीमधील तरुणांनी कोकणात होणाऱ्या रिफायनरीविरोधात डोंबिवली पूर्वेकडील छत्रपती शिवाजी महाराज पुतळा येथे एकत्र जमा होत आंदोलन केले. अगदी कमी वेळात सोशल मीडियाच्या माध्यमातून हे सर्व तरुण कोकण वाचवण्यासाठी एकत्र आले. चाकरमान्यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास पुष्पहार घालून आंदोलनाला सुरुवात केली.


## SEJAL GLASS LIMITED

173/174,3rd Floor, Sejal Encasa, S. V. Road, Kandivali ( West), Mumbai- 400 067
CIN - L26100MH1998PLC117437, Tel. No. - 91-22-28665100
Email - ashwin@sejalglass.co.in,Website-www.sejalglass.co.in

**Extract of Statement of Audited Financial Results for the Quarter and Year Ended 31st March 2023**

Rs in Lakhs except EPS

| Sr. No. | Particulars | STANDALONE | | | | | CONSOLIDATED | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | For Quarter Ended | For Quarter Ended | For Quarter Ended | For Year Ended | For Year Ended | For Quarter Ended | For Quarter Ended | For Year Ended |
| | | 31.03.2023 (Audited) | 31.12.2022 (Unaudited) | 31.03.2022 (Audited) | 31.03.2023 (Audited) | 31.03.2022 (Audited) | 31.03.2023 (Audited) | 31.12.2022 (Unaudited) | 31.03.2023 (Audited) |
| 1 | Total Income from operations | 1,225.20 | 1,167.49 | 876.57 | 4,660.31 | 2,449.76 | 1,225.20 | 1,167.49 | 4,660.31 |
| 2 | Net Profit/(Loss) for the period (before tax, Exceptional and Extraordinary items) | (22.39) | 34.77 | (18.56) | 48.25 | (322.18) | (99.93) | 38.74 | (25.32) |
| 3 | Net Profit/(Loss) for the period before tax and after Exceptional and Extraordinary items | (22.39) | 34.77 | (43.32) | (44.32) | 14,696.23 | (99.93) | 38.74 | (117.89) |
| 4 | Net Profit/(Loss) for the period after tax and after Exceptional and Extraordinary items | 880.61 | 34.77 | (43.32) | 858.68 | 14,696.23 | 803.07 | 38.74 | 785.11 |
| 5 | Paid -up Equity share capital (Face Value Rs 10/- per share) | 1,010.00 | 1,010.00 | 1,010.00 | 1,010.00 | 1,010.00 | 1,010.00 | 1,010.00 | 1,010.00 |
| 6 | Reserves Excluding Revaluation Reserve as per Balance Sheet of Previous accounting year | - | - | - | (980.72) | (2,386.09) | - | - | (1,054.28) |
| 7 | Earnings per share after tax and Extraordinary and/or Exceptional items (Face value of Rs 10/-each | | | | | | | | |
| (i) | Basic EPS (in Rs.) | 8.72 | 0.34 | (0.37) | 8.50 | 126.24 | 7.95 | 0.38 | 7.77 |
| (ii) | Diluted EPS (in Rs.) | 8.72 | 0.34 | (0.37) | 8.50 | 126.24 | 7.95 | 0.38 | 7.77 |

**NOTES**

1

2 The Audit Committee has reviewed the above financial results for the quarter ended and year ended March 31, 2023 at its meeting held on May 13, 2023 and the Board of Directors of Sejal Glass Limited ("the Company") have approved the same and its release at its meeting held on May 13, 2023.

3 Exceptional Loss for the year ended March 31, 2023 is in respect of loss on sale of non core assets as envisaged in Resolution Plan approved by the Hon'ble National Company Law Tribunal, Mumbai Bench. Exceptional Gain for the year ended March 31, 2022 is in respect of derecognition of financial and operational creditors (including statutory dues) as per the said Resolution Plan and reversal of Provision for Contingencies and Unforeseen Losses made in earlier years & impairment / Written off of Assets.

4 The Company has only one reportable segment i.e. Archietectural Glass Manufacturing Business and hence segment reporting is not applicable.

5 The Company had incorporated a Limited Liability Partnership by the name of Sejal Glass Ventures LLP ("LLP") on August 02, 2022 wherein the Company held 99.99% sharing in Profit and Loss and Capital Contribution. In the said LLP vide an agreement dated December 5, 2022 M/s. Dilesh Roadlines Pvt. Ltd., was admitted as Partner. Consequent upon the admission of new partner the Capital Contribution and Profit and Loss sharing of the Company has been reduced to 44.99%, thereby making it an associate of the Company. The said LLP has formed a wholly owned subsidiary by the name of M/s Sejal Glass and Glass Manufacturing Products LLC, in UAE on November 15, 2022.
The above consolidated results for the quarter and year ended March 31, 2023 are of the Company and the said LLP (including its wholly owned subsidiary as mentioned above) as per equity method prescribed under IndAS 28.

6 The Company had undergone Corporate Resolution Insolvency Process ('CIRP') under Insolvency and Bankruptcy Code ('IBC' or 'Code'), 2016, vide Order dated February 13, 2019, passed by the Hon'ble National Company Law Tribunal, Mumbai bench ('NCLT'). Subsequently the Hon'ble NCLT, Mumbai bench vide its Order dated March 26, 2021 ('Approval Date') read with Order dated June 7, 2021 ('the Order') has approved the Resolution Plan ('the Plan' or ' the Resolution Plan'). The said approved resolution plan provided for various reliefs/concession which was approved vide NCLT order. The said reliefs inter-alia contained capital reduction by exempting compliance with the requirements set out in Companies Act, 2013 (and the rules framed thereunder) and under any other Applicable Laws with respect to reduction of share capital.
In accordance with the approved Resolution Plan and in order to represent true and fair view of financial position of the Company post implementation of abovementioned Resolution Plan, the Company, based on expert opinion, has netted off the balances available under Securities Premium and Capital Reserve on reduction of share capital against the debit balance of profit and loss account as given below.
The detailed accounting treatment:"

| Particulars | As on 31st March 2023 (Amount in Rs. Lakhs) |
|---|---|
| Retained earnings (Pre-adjustment) | (27,321) |
| Adjusted by: | |
| a) Securities Premium | 14,066 |
| b) Capital Reserve on Reduction of Share Capital | 3,345 |
| Retained earnings (Post-adjustment) | (9,910) |

7 Post CRIP new management has taken over control of the Company and has taken various measures for revival and stabilization of the Business. The Company has substantial tax losses pertaining to prior to CIRP period viz. unabsorbed tax depreciation of INR 17060 Lacs (which are available without any time limitation) along with business losses of INR 9372 Lacs, totaling to INR 26432 Lacs ("Unused Tax Losses"). The Company has taken opinion from expert regarding allowability of the said tax losses under the Income Tax Law.
During the Quarter ended on 31st March 2023, the Company, based on its future projections and expert's opinion, has created at net deferred tax asset of INR 903 Lacs on Unused Tax Losses.

8 The Resolution Applicant(s) had deposited all the payments in accordance with the approved Resolution Plan as approved by the Hon'ble NCLT, Mumbai bench, vide order dated March 26, 2021 and the Company has distributed the same among the Creditors as per the approved Resolution Plan. Consequent upon the payments, the Resolution Plan stands fully implemented and the role of the Monitoring Committee has come to an end. The Chairman of the Monitoring Committee (Erstwhile Resolution Professional) has already filed an Interlocutory Application along with the progress report with the Hon'ble NCLT, Mumbai bench for Orders. The matter is pending for hearing.

9 Figures for the previous quarter/period/ year ended have been rearranged / re-grouped / reclassified wherever necessary, to correspond with those of the figures for the current year/quarter ended.

10 The quarter and year ended results are available on the websites of the Stock Exchanges viz. www.bseindia.com and www.nseindia.com and on the website of the Company at www.sejalglass.co.in

For Sejal Glass Limited
Sd/-
Jiggar Savla
Executive Director
DIN: 09055150

Date: May 13, 2023
Place: Mumbai


### महापालिका आयुक्त अभिजीत बांगर यांनी केली पाहणी

# ठाण्यातील रस्त्यांची कामे जलदगतीने सुरू

**ठाणे :** पूर्व द्रूतगती महामार्गावरील ज्ञानसाधना महाविद्यालयाजवळील सबवेचे काम पूर्ण होत आले आहे. हा मार्ग लवकरच खुला केला जाणार आहे. सबवे, त्याखालील नाला, तसेच ज्ञानसाधना महाविद्यालयाशेजारील रस्ता या कामांची पाहणी महापालिका आयुक्त अभिजीत बांगर यांनी केली.

महामार्गाखालून भास्कर कॉलनी मार्गे ठाणे शहरात येण्यासाठी तसेच, कोपरी आणि भास्कर कॉलनीतून ज्ञानसाधना महाविद्यालयाच्या दिशेने येण्यासाठी या सबवेचा उपयोग होणार आहे. सबवेचे काम एमएमआरडीए करीत असून त्याखालील नाल्याचे काम ठाणे महापालिका करीत आहे. सबवेला आणि सर्व्हिस रोडला जोडण्याचे काम अंतिम टप्प्यात आहे. त्या सोबतच सबवेचे सुशोभीकरण केले जात आहे.

नाल्याचे बांधकाम पूर्ण झाले असून त्यावर भराव टाकून रस्ता केला जाणार आहे. हा रस्ता १५ जूनपर्यंत पूर्ण होण्यासाठी उर्वरित कामाचे नियोजन तशा पद्धतीने करावे. बांधकाम अवधी काही प्रमाणात कमी झाला तरी गुणवत्तेत मात्र



तडजोड करू नये, असे आयुक्त बांगर यांनी सांगितले.

एलबीएस रोडवरील महत्त्वाचा चौक असलेल्या ॲपलॅब चौकाच्या काँक्रीटीकरणाचे कामही प्रगतीपथावर आहे. मध्यवर्ती भागातील काम पूर्ण होत आले असल्याने वाहतुकीस अडथळा येणार नाही. त्याचवेळी, उर्वरित रस्त्याचे काम करतानाही बहुतेक रस्ता वाहतूक योग्य राहील अशी व्यवस्था करावी, अशा सूचना आयुक्त बांगर यांनी दिल्या.

त्याचवेळी, मॉडेला मिल नाक्यावरील टोल प्लाझा येथे करण्यात आलेल्या नवीन मार्गिका, प्रस्तावित छत यांचीही पाहणी आयुक्तांनी केली.

नितीन कंपनी जंक्शनवरील रस्ते दुरुस्तीबद्दल यापूर्वीच्या पाहणी दौऱ्यात आयुक्तांनी सूचना दिल्या होत्या. त्याप्रमाणे मुख्य वाहतूक मार्गाचे काम झाले आहे. परंतु फुटपाथ, तसेच साइड पट्टी आणि काही पॅचेस शिल्लक आहेत. ते काम पूर्ण करावे तसेच, रस्ते दुभाजकांची दुरुस्ती करून घ्यावी, अशा सूचनाही त्यांनी दिल्या. इंदिरा नगर येथील मुख्य रस्त्यांवरील फुटपाथची पाहणी आयुक्त बांगर यांनी केली. हे फुटपाथ व्यवस्थित करून त्याची रंगरंगोटी पावसाळ्यापूर्वी करण्यास त्यांनी सांगितले.

शहरात २८२ रस्त्यांशिवाय, विकास आराखड्यातील रस्त्यांचीही कामे सुरू आहेत. ही कामे करताना भूसंपादन, अतिक्रमणे यांच्या काही अडचणी आहेत. त्याही पावसाळ्यापूर्वी दूर करण्याचे प्रयत्न सुरू आहेत. त्यातून मार्ग निघण्यास विलंब होत असेल तर तो रस्ता पावसाळ्यापूर्वी वाहतूक योग्य करून ठेवावा, अशा सूचना आयुक्तांनी बांधकाम विभागाला दिल्या.